**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार, दिनांक ०४ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

- **आयआयटी बॉम्बे, टाटा मेमोरियल केंद्र यांनी संयुक्तपणे विकसित केलेल्या कर्करोगग्रस्त रुग्णांसाठीच्या भारतातील पहिल्या स्वदेशी जनुकीय उपचारप्रणालीचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्घाटन.**
- **लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपणार; अकोल्यात वंचित बहुजन आघाडी कडून प्रकाश आंबेडकर तर काँग्रेस तर्फे अभय पाटील यांनी केला उमेदवारी अर्ज सादर.**
- **वाशिममध्ये महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांचा तर अमरावतीमध्ये भाजप उमेदवार नवनीत राणा यांचे नामांकन सादर, राणांचे जात प्रमाणपत्र वैध असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय.**
- **सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात 'स्वीप' अंतर्गत मतदार जनजागृतीसाठी येत्या 6 एप्रिल नागपुरच्या कस्तुरचंद पार्क येथे 7500 नागरिक, मतदानाचे धडे या उपक्रमांतर्गत घेतील सहभाग - जिल्हाधिकारी डॉ. विपिन ईटनकर यांची माहिती.**

*********

**द्रौपदी मुर्मू**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज आपल्या मुंबई भेटीत, आय.आय.टी. मुंबईत, कर्करोगग्रस्त रुग्णांसाठीच्या, भारतातील पहिल्या स्वदेशी जनुकीय उपचारप्रणाली अर्थात, सीएआर-टी सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केलं. टाटा मेमोरियल सेंटर, आयआयटी मुंबई आणि, इम्युनोॲक्ट यांनी संयुक्तरित्या याची निर्मिती केली आहे. यापद्धतीमुळं कमीत कमी खर्चात, रुग्णांवर परिणामकारक उपचार शक्य होणार आहे. यावेळी राज्यपाल रमेश बैस, आयआयटी मुंबईचे संचालक,

सुभाशिष चौधरी यांच्यासह, विविध मान्यवर उपस्थित होते. जगातील सर्वात किफायतशीर, सीएआर-टी उपचार प्रणाली नेक्स सीएआर१९ मुळं, अत्याधुनिक आरोग्य सेवेच्या बाबतीत, जगाच्या नकाशावर भारतानं ठळक स्थान मिळवलं आहे. सुलभतेनं आणि किफायतशीर दरात उपलब्ध होणाऱ्या या, सीएआर-टी सेल उपचार प्रणालीनं संपूर्ण मानवजातीसाठी एक नवी आशा जागवली आहे असं, प्रतिपादन यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं तर, ही यशोगाथा म्हणजे, 'विकसित भारता'चं ध्येय साध्य करण्याच्या दिशेनं टाकलेलं ठोस पाऊल आहे असं, राज्यपाल रमेश बैस म्हणाले.

**उमेदवारी अर्ज दूसरा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपणार आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या पश्चिम विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ-वाशिम या चार मतदारसंघात, तर पुर्व विदर्भात वर्धा आणि मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि परभणी अशा एकुण ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. या सर्व मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची लगबग सुरू आहे.  वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अर्ज भरण्यापूर्वी अकोल्यात मतदारांशी संवाद साधला. तत्पूर्वी वंचित बहुजन आघाडीच्या पक्ष कार्यालयापासून सुरू झालेली रॅली, फतेह चौक, सांगलीवाला शोरूम, खुलेनाट्यगृह, पंचायत समिती मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचली. त्याठिकाणी या रॅलीचे सभेत रूपांतर झाले. अकोला लोकसभा निवडणुक करीता आज कॉग्रेस पक्षातर्फे डॉ.अभय पाटील यांनी एबी फॉर्म सह आपले दोन उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कडे दाखल केले आहे, यावेळी त्यांच्या सोबत प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह  राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावर्षी लोकसभा निवडणूक ही चांगल्या मतांनी कॅग्रेस पक्ष जिंकेल असा विश्वास पाटील यांनी या वेळी पत्रकारांशी बोलतांना  व्यक्त केला.

**अमरावती/यवतमाळ नामांकन**

अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या, अमरावती लोकसभा मतदार संघामध्ये, भाजपा उमेदवार नवनीत राणा यांची, अर्ज भरण्यापूर्वी सभा झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते. २०२९ मध्ये, महाराष्ट्राच्या विधानसभेत ३३ टक्के महिला आमदार आणि देशाच्या लोकसभेत, ३३ टक्के महिला खासदार राहणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे, महिला राज आणणार आहेत म्हणून, या निवडणूकीत महिलांचा आशीर्वाद नरेंद्र मोदी यांनाच मिळणार आहे असं भाजपचे नेते आणि  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. अमरावती लोकसभा मतदारसंघात, भाजपाच्या उमेदवार नवनीत राणा यांनी, मागील पाच वर्ष घरी न बसता, अतिशय दुर्गम भाग असलेल्या मेळघाटातील आदिवासी जनतेची सेवा केली, म्हणून राणा यांना भरघोस मतांनी निवडून विजयी करा असं आवाहनही, फडणवीस यांनी केलं. दरम्यान, अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र, वैध असल्याचा निकाल, आज सर्वोच्च न्यायालयानं दिला. मुंबई उच्च न्यायालयानं नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र रद्द केलं होतं. अशा स्थितीत, लोकसभा निवडणूक लढविण्यावर बंधन आलं होतं. मात्र खासदार नवनीत कौर राणा यांची, याचिका स्वीकारताना, सर्वोच्च न्यायालयानं हा निर्णय दिला आहे. याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती, जेके माहेश्वरी आणि न्यायमूर्ती संजय करोल यांच्या खंडपीठानं, हा निकाल दिला. खासदाराचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याचा, उच्च न्यायालयाचा निर्णय, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठानं रद्द केला. यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार आणि   हिंगोलीचे विद्यमान खासदार, हेमंत पाटील यांच्या पत्नी, राजश्री पाटील यांनीही आज नामांकन अर्ज दाखल केला. 'हा मतदारसंघ माझं माहेर असून, या जन्मभूमीला कर्मभूमी म्हणून सेवा करण्याचा उद्देश, त्यांनी आयोजित सभेला संबोधित करताना व्यक्त केला. तर आमचं सरकार लोकांत जाऊन काम करतं. गेल्या दोन वर्षांत आम्ही विकास गतिमान केल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. राजश्री पाटील यांच्या समर्थनार्थ आयोजित या सभेला, मुख्यमंत्र्यांसह शिवसेनेच्या अनेक नेत्यांनी हजेरी लावली.

**लोकनिर्णय महाराष्ट्राचा घोषणा**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण, भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत, आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**'स्वीप' नागपूर**

रामटेक तसंच नागपूर लोकसभा मतदारसंघांत, निवडणुकीसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचे, दुसरे आणि तिसरे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, ईव्हीएम मशीन्स तयार झाले आहेत. तर, नागपूर जिल्ह्यात, सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात 'स्वीप' अंतर्गत मतदार जनजागृती करण्यासाठी, सहा एप्रिल, शनिवार रोजी, कस्तुरचंद पार्क इथ 7,500 नागरिक, मतदानाचे धडे, या उपक्रमांतर्गत सहभाग घेतील. यावेळी नागपुर जिल्हा प्रशासनानं तयार केलेले 'अधिकार है', हे मतदानाच महत्व अधोरेखित करणाऱ्या गाण्याचंही लोकार्पण होणार आहे अशी माहिती, नागपुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हाधिकारी, डॉ.विपिन ईटनकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. येत्या १९ एप्रिलला, मतदार केंद्रावर सर्व प्रकारच्या सुविधा असून, अर्ज भरण्यासाठी अपंगांना व्हीलचेअरची सुद्‌धा, सुविधा त्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देण्याचा, पथदर्शी प्रकल्प नागपूर जिल्ह्यात राबवणार असल्याची, त्याचबरोबर ग्रामीण भागात मतदान केंद्रावर, रांगेच्या व्यवस्थापनाकरिता नेहरू युवा केंद्राचे स्वयंसेवक सुद्‌धा उपस्थित राहणार असल्याचं, ईटणकर यांनी सांगितलं.

**मतदान जागृती**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता निवडणूक आयोगाच्या निर्देशान्वये, 'मिशन युवा आणि मिशन डिस्टिंग्शन' अंतर्गत, नवमतदार आणि मतदारांची

टक्केवारी वाढविण्याच्या हेतूनं जनजागृती प्रचार-प्रसाराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कविवर्य सुरेश भट सभागृह इथं उद्या सकाळी साडेदहा वाजता हा जनजागृती कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाला प्रामुख्यानं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू, डॉ.प्रशांत बोकारे, जिल्हा निवडणूक अधिकारी नागपूर, डॉ.विपीन इटनकर, आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा, स्वीपच्या जिल्हा नोडल अधिकारी, सौम्या शर्मा उपस्थित राहून या संदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाकरिता मोठ्या संख्येनं विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

**महावितरण**

महावितरणची वेबसाइट आणि मोबाईल ऍपद्वारे, ऑनलाइन वीजबिल भरणाऱ्या, लघुदाब वीजग्राहकांची संख्या, नागपूर परिमंडलात ५४ टक्क्यांवर गेली आहे तर, ऑनलाईन बिल भरणा केलेली रक्कम ६१.७२ टक्के झाली आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये परिमंडलातील एकूण ९१ लाख ९२ हजार ५४८ व्यवहारांच्या माध्यमातून वीजग्राहकांनी घरबसल्या तब्बल दोन हजार २२० कोटी रुपयांच्या वीजबिलांचा ऑनलाइन भरणा केला.नागपूर जिह्यातील बुटीबोरी, कॉंग्रेसनगर आणि सिव्हील लाईन्स तर वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट विभागात ऑनलाईन वीज भरणा करणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण सर्वाधिक असून परिमंडलात सर्वत्र ऑनलाईन वीज भरण्याचा कल दिवसेंदिवस वाढत आहे. दरम्यान, लघुदाब वीज ग्राहकांसाठी ऑनलाइन बिल भरण्यासाठी दरमहा ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के सूट देण्यात येत आहे.

**भारतीय निवडणुक आयोग**

भारतीय निवडणुक आयोगानं, शासकीय कर्मचारी, पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करू शकत नसल्याच्या अफवा, खोट्या असल्याचं सामाजिक माध्यमांद्वारे स्पष्ट केलं आहे. निवडणुकांच्या दरम्यान, कार्यरत कर्मचारी नियुक्त मतदार सुविधा केंद्रावर पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करू शकतात. त्यामुळं अशा अफवांकडे दुर्लक्ष करावं

आणि खात्रीशीर माहितीसाठी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

**चंद्रपूर ईव्हीएम रँडमायझेशन**

चंद्रपूर लोकसभा मतदार संघांतर्गत, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटचे, द्‌वितीय रँडमायझेशन अर्थात सरमिसळ प्रक्रिया, जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी सामान्य निवडणूक निरीक्षक, लोकेशकुमार जाटव, निवडणूक निर्णय अधिकारी, विनय गौडा जी.सी. तसंच, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात, मतदान केंद्रांची संख्या, २,११८ असून यासाठी २,६१० बॅलेट युनिट, २,६१० कंट्रोल युनीट आणि २,८१८ व्हीव्हीपॅट उपलब्ध झाल्या आहेत. मतदार संघानुसार, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट निश्चित झाल्या आहेत.

*****